# लो. टिळक विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

10.4.2025

नवराष्ट्र, भंडारा प्लस



तुमसर, (श .प्र.). लोकमान्य टिळक राष्ट्रीय विद्यालयात क्विक हिल फाउंडेशनतर्फे 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भंडारा येथील जे.एम. पटेल महाविद्यालयाच्या संगणक विज्ञान विभागातील विद्यार्थी मृणाली रहांगडाले आणि रिया पुंडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत मोबाइल फोनचा वापर, इंटरनेटचा वापर आणि ऑनलाइन जगतातील सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या खबरदारीबाबत विद्यार्थ्यांना जागृत केले. सायबर योद्धयांनी विद्यार्थ्यांना स्वतःसह आपल्या कुटुंबाला डिजीटल युगात सुरक्षित ठेवण्यासाठी विविध उपाययोजना आणि योग्य सवयींबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी क्विक हिल फाउंडेशनचे नागेश तलारी, जे.एम. पटेल महाविद्यालयाच्या संगणक विज्ञान विभाग प्रमुख डॉ. प्रवीण घोसेकर उपस्थित होते. लोकमान्य टिळक राष्ट्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापक मारबते यांनी, नानाजी जोशी स्कूल व कॉलेजच्या विद्यार्थ्यांना क्विक हिल फाउंडेशनने अत्यंत उपयुक्त असे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. यासाठी त्यांनी फाउंडेशनच्या अनुपमा काटकर व अजय शिर्के यांचे आभार मानले.